जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 1 OCT 2019
तरुण भारत

देशाचा विकास आणि लोकशाही बळकटीकरणामध्ये तरुणांचे योगदान महत्वाचे आहे. त्यामुळे तरुण मतदारांनी जात, धर्म, पंथ यामध्ये न अडकता योग्य उमेदवाराला मतदान करावे. मतदाना दिवशी सुट्टी आहे, म्हणून सहलीचे नियोजन न करता मतदानाचा हक्क बजावावा. मत कोणाला द्यायचे हे ठरवण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. मताची विक्री न करता प्रत्येकाने देशहीत डोळ्यासमोर ठेवून योग्य उमेदवारास मतदान करावे. **- डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरु (शिवाजी विद्यापीठ)**

# मतदान करून

## लोकशाही बळकट करू



लोकशाही सदृढ करण्यासाठी प्रत्येकाने मतदानाचे कर्तव्य बजावले पाहिजे. मतदानादिवशी देण्यात येणारी सुट्टी ही याच सामाजिक कर्तव्यासाठी दिलेली असते याचे भान राखून जबाबदारीने व जाणीवपूर्वक मतदान केले पाहिजे. कोणताही धर्म, जात, पंथ, संघ न पाहता अभ्यासू नेतृत्व निवडीच्या निकषावर आपल्या लोकप्रतिनिधीची निवड करण्याचा सूज्ञपणा मतदाराने दाखवणे ही आजची गरज आहे.

– डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू

# तंत्रज्ञान, आर्थिक नियोजनामुळे उद्योगांना सावरणे शक्य : रेड्डी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आर्थिक नियोजन व अनावश्यक खर्चाची कपात, गरजेपेक्षा जास्त साठा थांबविणे, तंत्रज्ञानाचा उपयोग यामुळे उद्योगांना आर्थिक मंदीतून सावरता येणे शक्य आहे, असे प्रतिपादन सिनर्जी ग्रीन इंडस्ट्रिजचे कार्यकारी संचालक व्ही. एस. रेड्डी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एम.बी.ए. अधिविभागातर्फे उद्योग व शिक्षण संस्था

**उद्योग-शिक्षण संस्था संवाद कार्यक्रम**

संवाद कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

रेड्डी म्हणाले, उद्योजकांनी आर्थिक मंदीकडे एक संधी म्हणून बघितले पाहिजे. आरोग्य, सुरक्षा व पर्यावरण क्षेत्रात होत असलेल्या बदलांकडे व संधींकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. एम.बी.ए अधिविभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी कार्यक्रमाचा हेतू विषद केला. वाणिज्य व व्यवस्थापन विभागप्रमुख प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी मंदी व त्यावरील उपाययोजना या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. दीपा इंगवले, डॉ. अनुप मुळे, भावकु पाटील यांनी प्रयत्न केले.



**कोल्हापूर : करवीर नगर वाचन मंदिर येथे झालेल्या कार्यक्रमावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याबरोबर शालेय विद्यार्थी व विद्यार्थिनी.**

# जे चांगले ते वाचलेच पाहिजे

## डॉ. डी. टी. शिर्के; वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २० : ग्रंथालयात वेगवेगळ्या प्रकारची, वेगवेगळ्या विषयांची पुस्तके असतात. आपल्या आवडीप्रमाणे, वेळेप्रमाणे, सवडीप्रमाणे ती पुस्तके वाचली पाहिजेत. किंबहुना जे जे चांगले आहे ते प्रत्येकाने वाचलेच पाहिजे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

करवीर नगर वाचन मंदिर आणि वाचनकट्टा व राज्य मराठी विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने करवीर नगर वाचन मंदिर येथे आयोजित वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ. डी. टी. शिर्के यांनी मुलांमध्ये बसून, त्यांच्याशी समरस होऊन संवाद साधला. प्राथमिक शिक्षण समितीचे विजय माळी, एस. डी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

वैदेही जोशी, करवीर नगर वाचन मंदिरचे उपाध्यक्ष नंदकुमार मराठे, दीपक गाडवे, सतीश कुलकर्णी, उदय सांगवडेकर, मनिषा वाडीकर, राज्य मराठी विकास संस्थेचे समन्वयक दत्तात्रय डवण, अपूर्वा खांडेकर, तनया सुतार, आरजू बागीर आदी उपस्थित होते. वैशाली माने यांनी शिशु विहार शाळेच्या मुलांशी गोष्टीरूपी संवाद साधत वाचनाचे महत्व विषद केले. हसत खेळत आनंदाने अभ्यास करता येतो, असे मत त्यांनी व्यक्त केले. युवराज कदम यांनी प्रास्ताविक केले. अश्विनी वळिवडेकर यांनी आभार मानले. मनिषा शेणई यांनी सूत्रसंचालन केले.

# ‘प्रतित्यसमुत्पाद’ पुस्तकाने विद्यापीठाच्या लौकिकात भर

## डॉ. श्रीकृष्ण महाजन; विद्यापीठात पुस्तक प्रकाशन सोहळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २० : ‘डॉ. ज. रा. दाभोळे यांनी बुद्ध तत्त्वज्ञानातील अत्यंत महत्त्वाच्या पण तितक्याच दुर्लक्षित अशा प्रतित्यसमुत्पादाचे विश्लेषण करणारे पुस्तक लिहिले आहे आणि या पुस्तकाच्या प्रकाशनामुळे विद्यापीठाच्या लौकिकात भर पडली आहे. हे तत्त्वज्ञान मुळापासून समजून घेण्यासाठी दाभोळे यांचे हे पुस्तक अतिशय महत्त्वाचे ठरेल,’ असा विश्वास डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठातील पुस्तक प्रकाशन सोहळ्यात ते



डॉ. ज. रा. दाभोळे

बोलत होते.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले.

या वेळी ज्येष्ठ तत्त्वज्ञ डॉ. ज. रा. दाभोळे म्हणाले, ‘‘अस्मिन सति, इदं भवति अर्थात हे असेल, तर ते घडते, असे हे बुद्धाचे प्रतित्यसमुत्पादाचे तत्त्वज्ञान आहे. बुद्धांनी या तत्त्वज्ञानाची मांडणी करतानाही मध्यम मार्गाचाच स्वीकार केल्याचे दिसते.’’

डॉ. दीपा श्रावस्ती यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. जगन कराडे, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. रवींद्र श्रावस्ती, प्रा. विनय कांबळे, आर. वाय. लिधडे, डॉ. यु. के. सकट, डॉ. ए. व्ही. मोहोळकर यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.